जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-02/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 20.04.2021

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) चे प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 29.04.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**
**श्री/श्रीमती -------------------------------**
**सदस्य /सदस्या,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**विषय क्रं.** 01

स्थानिक निधी लेखापरिक्षा (मनपालेप), उपविभाग-3, औरंगाबाद यांचे मार्फत सन 2015-16 या वित्तीय वर्षाचा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका लेखा परिक्षण अहवाल मुख्य लेखापरिक्षण विभागास प्राप्त झाला असुन सदरील अहवालास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 107 (अ) अन्वये सदर लेखा परिक्षण अहवाल महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची तरतुद आहे. त्यानंतर आयुक्त महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम यातील तरतुदीनुसार अहवालावर आवश्यकती पुढील कार्यवाही करील. असे नमुद आहे त्यामुळे सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर करुन मान्यतेस्तव सादर. **(सोबत लेखापरिक्षण अहवालाची पुस्तक)**

**विषय क्रं.** 02

**विषय :-** दिव्यांगासाठी राखीव असलेल्या 5% निधीतून पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य खरेदीसाठी अर्थसहाय्य देणे बाबत

**संदर्भ :-** 1) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. 2015/प्र.क्र.118/नवि-20 दिनांक 28.10.2015
2) नांदेड वाघाळा शहर मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 65 दिनांक 19.12.2017
3) शासन निर्णय क्रं. दिव्यांग-2018/प्र.क्र.52/नवि-28 दिनांक 10 मे 2018
4) शासन निर्णय क्रं. विसयो-2017/प्र.क्र.203/विसयो दिनांक 03.11.2018
5) जा.क्रं. नावाशमनपा/दिव्यांग क.क./1213/2020 दिनांक 02.06.2020
6) मनपा ठराव क्रं. 105 दिनांक 26.10.2020

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड दिव्यांग (अपंग) कल्याण कक्ष अंतर्गत शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी महानगरपालिका अर्थसंकल्पामध्ये 5 टक्के निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे.

त्यानुसार दिनांक 29.05.2020 रोजी सकाळी मा. आयुक्त पंग कल्याण आयुक्तालय पुणे यांनी व्हिडीओ कॉन्फर्स मध्ये दिव्यांगासाठी राखीव 5% निधीमधुन खालील लाभ देण्याबाबत सुचना केल्या आहेत.

01 ज्या दिव्यांगांना वैद्यकिय लाभाची आवश्यक्ता आहे अशा दिव्यांग नागरीकांना वैद्यकिय खर्चाकरीता अर्थसहाय्य करणे.

02 कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असुन त्यामुळे आवश्यकते नुसार दिव्यांगांना अन्नधान्य खरेदी करीता अर्थसहाय्य करणे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 65 दिनांक 19.12.2017 अन्वये वैद्यकिय खर्च लाभार्थ्यांना मंजुर करण्यासाठी रुपये 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) उत्पन्नाची अट ठेवण्यात आलेली आहे. सध्या शहरामध्ये तसेच देशामध्ये कोरोना रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे दिव्यांग नागरीकांना उपासमारीची वेळ येऊ नये आणि त्यांच्या आरोग्यास कोणताही धोका होऊ नये म्हणुन त्यांना अन्नधान्य खरेदीसाठी अर्थ् सहाय्य करणे आणि वैद्यकिय खर्चासाठी अर्थसहाय्य करणेसाठी त्यांच्याकडून खालील कागदपत्र व निकष आणि रुपये 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार केवळ) उत्पन्नाची अट शिथील करण्यासाठी सर्व साधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

1) अर्जदाराचे अपंगत्व शासनाच्या नियमानुसार (कमीत कमी 40%) प्रमाणपत्र असावे.

2) दिव्यांग व्यक्ती हा महानगरपालिकेच्या हद्दितील असावा व पुढिल पैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे. निवडणुक ओळखपत्र / रहिवाशी प्रमाणपत्र (तहसील कार्यालयाचे)/ आधार कार्ड / राशन कार्ड/ मनपा कर पाती / पेन कार्ड.

3) बँक पासबुगची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे (लहान बालक व बौध्दीकदृष्टया अक्षम असणा-या अर्जदारा ऐवजी त्यांचे पालक अथवा कायदयानुसार पालकत्व धारण केलेली व्यक्तीचे बँक पासबुक जोडलेले चालेल).

4) लहान बालक व बौध्दीकदृष्टया अक्षम असणा-या अर्जदारा ऐवजी त्यांचे पालक अथवा कायदयानुसार पालकत्व धारण केलेली व्यक्ती अर्ज सादर करु शकतील.

5) अर्जदार हा शासकिय किंवा निमशासकिय सेवेत नसावा.

शासन निर्णय, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. संकिर्ण-2015/प्र.क्र/118/नवि-20 दिनांक 28.10.2015 मधील सुचना क्रं. 18 नुसार स्थानिक परिस्थितीनुसार असलेल्या महत्वाकांक्षी योजना अमलात आणणे असे नमुद आहे. त्यानुसार कोवीड-198 च्या संसर्गजन्य रोगामध्ये दिव्यांग नागरीकांना उमासमारीची वेळ येऊ नये आणि त्यांच्या आरोग्यास कोणताही धोका होऊ नये म्हणुन त्यांना राशन खरेदीसाठी अर्थ सहाय्य करणे आणि वैद्यकिय खर्चासाठी अर्थ सहाय्य करणे करीता त्यांच्याकडून वरील प्रमाणे कागदपत्रे व निकष आणि रुपये 50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार केवळ) निवळ तात्पुरत्या स्वरुपात उत्पन्नाची अट शिथिल करुन वैद्यकिय खर्चासाठी रु. 5000/- (अक्षरी रुपये पांच हजार केवळ) आणि राशन खरेदीससाठी संदर्भ क्रं. 06 नुसार प्रती महा रु. 1000/- (अक्षरी रुपये एक हजार केवळ) कोरोना विषाणु प्रादुर्भाव असल्यामुळे माहे जुन 2020 ते 31 मार्च 2021 पर्यंत अर्थसहाय्य देण्यात आले होते. सध्या शहरात कोवीड-19 या संसर्गजन्य रोगाचा वाढता प्रादुर्भाव पाहता दिव्यांग व्यक्तीवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणुन पात्र लाभार्थ्यांना तुर्तस माहे एप्रिल 2021 व मे 2021 या दोन महिन्याकरिता व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव असे पर्यंत वरील अटीच्या अधिनराहुन अन्नधान्य खरेदीसाठी प्रति माहे 1000/- प्रमाणे दिव्यांगासाठी राखीव असलेल्या 5% निधीतुन अर्थसहाय्य देणे करिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेची मंजुरीस्तव सादर.

**स्वाक्षरीत/-**

**(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**